गोदातीर 07/06/2025

# दरोडा आणि इतर गंभीर गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध मोक्का; शिवाजीनगर पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहर व परिसरात दरोडा, खुनाचा प्रयत्न आदी गंभीर गुन्ह्यात सतत सक्रिय असणाऱ्या सहा जणांविरुद्ध शिवाजीनगर पोलिसांनी मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली आहे. यातील तीन आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांना निरीक्षणगृहात पाठवले आहे. ही कारवाई प्रभारी ठाणेदार शिवाजी गुरमे यांनी केली.

जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, चझऊ अंतर्गत सन २०२४ मध्ये एकुण १३ रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगाराना कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे. सन २०२५ या वर्षामध्ये दहा (१०) सराईत गुन्हेगारास कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे. त्याचबरोबर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सन २०२४- २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे एकुण ८७ गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे एकुण १० गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. कायद्याचा आदर करणारे शांतता प्रिय नागरीकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर पोलीसांची बारकाईने नजर असून अशा गुन्हेगारांची २+ स्किम अंतर्गत यादी बनवुन गुन्हेगारांवर मोठ्या प्रमाणे कलम ५५,५६ मपोका प्रमाणे हद्दपार, मोक्का, एमपीडी तसेच स्थानबध्द सारखी कठोर प्रतिबंधात्मक कारवाई नांदेड पोलिसांकडून करण्यात येत आहे.

लोकमत दि. 07/06/2025

# दरोडेखोर महिलेसह सहा जणांविरुद्ध 'मोक्का'; सहा महिन्यांत ८७ प्रस्ताव

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** दरोड्यात सहभागी असलेल्या महिलेसह तीला साथ देणाऱ्या पाच जणांवर पोलिसांनी मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई केली आहे. एखादी महिला गुन्हेगार हद्दपार होण्याची ही जिल्ह्यातील दुसरी घटना असून जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी घेतलेल्या निर्णयाचे स्वागत होत आहे.

जिल्ह्यातील शांतता व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी अभिलेखावरील सक्रीय तसेच वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती काढून त्यांच्याविरुद्ध टू प्लस स्कीमअंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश यंत्रणेला पोलिस अधीक्षकांनी दिले होते. प्रतिबंधात्मक कारवाई करुनही सुधारणा होत नसलेल्या आरोपींविरुद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्याचे सांगितले होते. त्यानुसार जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यात गत पाच महिन्यात तब्बल ८७ जणांचे हद्दपारीचे प्रस्ताव तयार करण्यात आले. पैकी दहा सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध करुन त्यांची रवानगी कारागृहात करण्यात आली. तसेच महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ५५ नुसार ८७ जणांना हद्दपार केले.

कलम ५६ नुसार १० जणांवर कारवाई झाली. गतवर्षीही १३ कुख्यात गुन्हेगारांना स्थानबद्ध करण्यात आले होते. संघटीत गुन्हेगारीची पाळेमुळे खोदून काढण्यासाठी सर्व पोलिस ठाणे स्तरावर कडक उपाययोजना करण्यात येत असून आगामी काळात गुन्हेगारांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

### तीन विधीसंघर्षग्रस्त बालके

शिवाजीनगर ठाण्याच्या हद्दीत हिंगोली गेट परिसरात वास्तव्य असलेली गंगासागर उर्फ माया राघविंदर माथेकर, राघविंदर उर्फ राजू अशोक माथेकर, मोहमद असिफ मोहमद असलम तवर यांच्यासह अन्य तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांनी परिसरात धुमाकुळ माजवला होता. त्यांच्याविरुद्ध दरोड्यासह अन्य अनेक प्रकारचे गंभीर गुन्हे केल्याची नोंद पोलिस दप्तरी होती. उपरोक्त आरोपींमुळे परिसरात दहशतीचे वातावरण पसरले होते. या आरोपींविरुद्ध एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश शिवाजीनगर पोलिसांना एसपींनी दिले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलिस अधिकारी व एलसीबीच्या मदतीने प्रस्ताव तयार केला होता.